| | |
|---|---|
| | नियमित दिवाणी दावा क्र. १/२०२६ मधील<br>अर्ज निशाणी क्रमांक २० खालील आदेश<br>(CNR No.MHWS050000142026 ) |

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांचेतर्फे त्यांना लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२) सदरचा अर्ज वाचला. त्यास वादीच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. प्रतिवादी क्र. १ आणि वादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

३) प्रतिवादी क्र.१ यांचे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र.१ यांना महत्वाची कागदपत्रे लवकर मिळाली नसल्यामुळे ते कायदेशीर मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल करु शकले नाही. तरी प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा आणि प्रस्तुतच्या अर्जासोबत दाखल केलेला प्रतिवादी क्र. १ यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात यावा.

४) याउलट वादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ यांनी विहीत मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, निशाणी क्र. ७ खालील दि.२१.१.२०२६ रोजीच्या बेलीफच्या अहवालानुसार प्रतिवादी क्र.१ यांना या दाव्याचे समन्स मिळाले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ हे वकीलपत्र निशाणी क्र. ८ नुसार दिनांक २९.१.२०२६ रोजी या दाव्यात हजर झाले आहेत.

६) दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ मधील आदेश ८ नियम १ नुसार दाव्याचे समन्स मिळाल्यापासून जास्तीत जास्त ९० दिवसांच्या आत प्रतिवादीने त्यांचा लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे. या दाव्याचे समन्स प्रतिवादी क्र. १ यांना दिनांक २१.१.२०२६ रोजी मिळालेले आहे आणि प्रतिवादी क्र.१ हे यांचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज दिनांक ५.५.२०२६ रोजी दिलेला आहे. उपरोक्त दोन्ही तारखा विचारात घेतल्या तर प्रतिवादी क्र. १

यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास १४ दिवसांचा विलंब झालेला आहे असे दिसून येते.

७) हे सर्वज्ञात आहे की, कोणताही दावा गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्हीही पक्षकारांना पुरेशी संधी मिळणे गरजेचे आहे. वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दावा जाहिर ठरावासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. या परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ यांचा लेखी जबाब अभिलेखावर आला तर प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली करण्यास तो उपयुक्त ठरु शकतो. प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास १४ दिवसांचा विलंब झालेला आहे व तो झालेला विलंब काही खर्च आकारुन माफ करता येवू शकतो. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेऊन नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली निघण्यासाठी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

१] प्रस्तुतचा अर्ज नि. २० हा रक्कम रुपये २५०/– च्या खर्चावर मंजूर करण्यात येत आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला १४ दिवसांचा विलंब माफ करण्यात येत आहे.

२] प्रतिवादी क्र.१ यांनी उपरोक्तनुसारची खर्चाची रक्कम वादीस दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.05.05 17:02:11 +0530

स्थळ :मंगरुळपीर
दिनांक : ०५/०५/२०२६.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>Civil Judge Senior Division,<br>Mangrulpir. |
| Date of Decision | : | 5.5.2026 |
| Order signed by the P.O. on | : | 5.5.2026 |
| Order Uploaded on | : | 5.5.2026 |